ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ

ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ಸಾಕ್ಷರತಾ ಇಲಾಖೆ

ಪಠ್ಯಕ್ರಮ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಮಾಪನ ಸಾಮಗ್ರಿ

2025–26

ವಿಷಯ : ಪರಿಸರ ಅಧ್ಯಯನ

ವರ್ಗ : 2



ರಾಜ್ಯ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ,

ಬನಶಂಕರಿ 3 ನೇ ಹಂತ, ಬೆಂಗಳೂರು – 560085

ಜಿಲ್ಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

Concept and Guidance

Smt Rashmi Mahesh V, IAS
Principal Secretary to Government
Department of School Education and Literacy

Dr. Trilokchandra K.V IAS	**Shri. Gopalakrishna H.N**
Commissioner Department of School Education, Bangalore	Director, DSERT Bangalore

DIET Co-operation

Shri. Sanjeev Hulloli Principal DIET, Chikkodi	Dr. K B Talawar Lecturer DIET, Chikkodi

Composition

Smt. Radha P.
Senior Assistant Director
DSERT Bangalore

Mentor & Examiner

Shri. D. H. Kamble
Govt M. H. P.S. Rampur
Tal. Dist : Chikkodi

LESSON BASED ASSESSMENT MATERIAL CREATION RESOURCE TEAM OF 3RD EVS MARATHI MEDIUM

Shri. A. M. Magadum	Govt MHPS Ugar KH Tal : kagawad Dist : Chikkodi
Shri. S. A. kuraluppe	Govt MLPS Hunaman Nagar Mangasuli Tal : kagawad Dist : Chikkodi
Shri. C. A. Kumbhar	Govt MLPS Sunnadkodi Tal: Athani Dist : Chikkodi

अनुक्रमाणिका

निल नक्षा Blue Print

पाठ क्रमांक	पाठ	ज्ञान	आकलन	अभिव्यक्ती	कौशल्य
1	प्राणी ओळख	(3+2)4(7)	(1+2)3 (8)	(2+2)2 (5)	(3) 1(2)
2	प्राण्यांचे संगोपन	(3)3(8)	(2+4)4(10)	(2+2)2(7)	(3)1(2)
3	परसातील झाडे	(3)3(15)	(2+4)4(20)	(2+2)2(3)	(3)1(2)
4	आम्ही आहोत तुमच्यासाठी	(3+2)4(11)	(1+2)3(10)	(2+2)2(4)	(3)1(3)
5	अमूल्य पाणी	(3+2)4(7)	(1+2)3(6)	(2+2)2(2)	(3)1(2)
6	आहाराची विविधता	(3+2)4(12)	(1+2)3(9)	(2+2)2(4)	(3)1(3)
7	घर हवे घर	(1+2)3(6)	(3+2)4(8)	(2+2)2(3)	(3)1(2)
8	शरीराचे अवयव व आरोग्य	(3+2)4(10)	(1+2)3(8)	(2+2)2(4)	(3)1(1)
9	माझी सुरक्षितता	(1+2)3(6)	(3+2)4(8)	(2+2)1(2)	(3)2(1)
10	आम्हा सर्वांची संपत्ती	(3+2)4(15)	(1+2)3(10)	(2+2)2(3)	(3)1(2)
11	प्रवास	(1+2)3(16)	(3+2)4(12)	(2+2)1(3)	(3)2(2)
12	माझे कुटुंब	(1+2)3(8)	(3+2)4(11)	(2+2)2(4)	(3)1(2)
13	सण आणि समारंभ	(3+2)4(13)	(1+2)3(11)	(2+2)2(4)	(3)1(2)
14	वडीलधाऱ्यांची काळजी	(3+2)4(7)	(1+2)3(6)	(2+2)2(2)	(3)1(2)
15	सहाय्य – सहकार्य	(1+2)3(8)	(3+2)4(11)	(2+2)2(4)	(3)1(2)
16	चला खेळू	(3+2)4(12)	(1+2)3(9)	(2+2)1(5)	(3)2(2)
17	आम्हाला हे पाहिजे	(3+2)4(8)	(1+2)3(7)	(2+2)2(3)	(3)1(2)
18	आकाशात	(1+2)3(7)	(3+2)4(9)	(2+2)2(3)	(3)1(2)
19	माझे गाव सुंदर गाव	(1+2)3(7)	(3+2)4(8)	(4)1(3)	(3)2(2)

टीप

पहिल्या कंसात *(*)* दिलेली संख्या ही गुण आहेत
कंसा बाहेरील संख्या निवडावयाची प्रश्न संख्या आहे
दुसऱ्या कंसातील*(**)* संख्या प्रश्नपेढीमध्ये असणारे उपलब्ध प्रश्न संख्या आहेत

कठीणतेचे स्तर

पाठ क्रमांक	पाठ	अती सुलभ	सुलभ	कठीण
1	प्राणी ओळख	10	10	2
2	प्राण्यांचे संगोपन	12	12	3
3	परसातील झाडे	20	17	3
4	आम्ही आहोत तुमच्यासाठी	15	10	3
5	अमूल्य पाणी	10	5	2
6	आहाराची विविधता	15	9	4
7	घर हवे घर	9	8	2
8	शरीराचे अवयव व आरोग्य	12	8	3
9	माझी सुरक्षितता	10	5	2
10	आम्हा सर्वांची संपत्ती	16	10	4
11	प्रवास	17	11	5
12	माझे कुटुंब	12	10	3
13	सण आणि समारंभ	16	10	4
14	वडीलधाऱ्यांची काळजी	10	5	2
15	सहाय्य – सहकार्य	12	10	3
16	चला खेळू	15	10	3
17	आम्हाला हे पाहिजे	10	8	2
18	आकाशात	11	8	2
19	माझे गाव सुंदर गाव	10	8	2

पाठ 1 ला :- प्राणी ओळख .

अध्ययन निष्पत्ती:- तुझ्या परिसरातील प्राणी व पक्षी ओळखशील.

प्रश्न:- 1) योग्य पर्याय निवडा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) कोणता प्राणी घरात पाळतात?

अ)हत्ती ब)सिंह क)कुत्रा ड) साप

2) कोणता प्राणी पाण्यात राहतो?

अ) सिंह ब) डुक्कर क) मासा ड) गाय

3) खालीलपैकी कोणता प्राणी उंच झाडावर चढतो?

अ)गाढव ब)हत्ती क)माकड ड) घोडा

4) कोणता प्राणी सरपटतो?

अ)म्हैस ब)शेळी क) साप ड) गाय

5) खालीलपैकी उडणारा प्राणी कोणता ?

अ)कावळा ब)मगर क) हरीण ड) घोडा

6) खालीलपैकी चालणारा प्राणी कोणता?

अ)घार ब)गरुड क) हत्ती ड)मासा

7) खालीलपैकी कीटक ओळखा?

अ)मधमाशी ब) साप क) झुरळ ड) कुत्रा

8) घराची राखण करणारा प्राणी ओळखा ?

अ)वाघ ब)सिंह क)कुत्रा ड)अस्वल

9) काळा आणि राखाडी रंगाचा काव काव करणारा पक्षी कोणता?

अ) चिमणी ब)कबूतर क)कावळा ड) बगळा

10) पांढऱ्या रंगाचा मोठा पक्षी जो पाणथळ जागी दिसतो तो कोणता ?

अ)कावळा ब)कबूतर क)बगळा ड) पोपट

प्रश्न:- 2रा रिकाम्या जागा भरा.

11) ________ अंडी घालणारा पाळीव पक्षी आहे .

अ)कोंबडी ब)कावळा क)कोकिळा ड) चिमणी

12) उडू शकत नाही पण मोठा पक्षी आहे________

अ) गरुड ब)मोर क)शहामृग ड) बगळा

13) ________हिरवा पोपटी रंगाचा बोलणारा पक्षी आहे.

अ)कावळा ब)पोपट क)चिमणी ड) घार

14) अंगावर काटे असलेला लहान प्राणी ______

अ)कुत्रा ब)मांजर क)साळींदर ड) शेळी

15) तुझा सर्वात आवडता प्राणी _________

अ)कुत्रा ब)मांजर क)गाय ड) म्हैस

16) कावळा_____ रंगाचा असतो.

अ)हिरवा ब) काळा क) पोपटी ड) पांढरा


17) मोर ___________ नाचतो.

अ)पावसात ब)उन्हात क)सावली ड) घरात


18) __________आपले घर स्वतः बनवतो .

अ)पक्षी ब)प्राणी क) कीटक ड) मुंगूस


19) प्राणी ओळख व खालील दिलेल्या चौकटीत नाव लिही?



20) खाली कीटकांची चित्रे दिलेली आहेत त्यापुढे त्यांची नावे दिली आहेत रेषा मारून जुळव .



21) खाली दिलेले प्राणी कसे हालचाल करतात चित्र बघ जोड्या जुळव.



22) तू पाहिलेल्या प्राण्यांची नावे लिही.

अ)उडणारे प्राणी _ 1) ____________________ 2) ____________________

ब) सरपटणारे प्राणी_1) ____________________ 2) ____________________

क) चालणारे प्राणी_ 1) ____________________ 2) ____________________

ड) कीटक___ 1) ____________________ 2) ____________________

पाठ 2 रा :-प्राण्यांचे संगोपन

अध्ययन निष्पत्ती:- 1)पाळीव प्राणी व पाळीव नसलेले प्राणी यांचे वर्गीकरण करशील.

2) पाळीव प्राण्यांचे संगोपन करण्याची सवय लावून घेशील.

प्रश्न 1ला.योग्य पर्याय निवडा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) गाय आपल्याला काय देते?

अ) पाणी ब) वाळू क) माती ड) दूध

2) गाईला काय खायला दिलं जातं?

अ)पेपर ब) प्लास्टिक क) गवत ड) काच

3) प्राण्यांना काय आवश्यक असते?

अ) मोबाईल ब)अन्न व पाणी क) टीव्ही ड)खेळणी

4) कोणता प्राणी पाळीव नाही?

अ) सिंह ब) कुत्रा क)मांजर ड) गाय

5) कोणता प्राणी पाळीव आहे ?

अ) वाघ ब) चित्ता क) म्हैस ड) सिंह

6) कोणता प्राणी शेतात काम करतो?

अ) माकड ब) बैल क) घुबड ड) खार

7) खालीलपैकी कोणता प्राणी जंगली आहे?

अ)गाय ब) शेळी क) हत्ती ड)मेंढी

8) कोणता प्राणी घराची राखण करण्यासाठी पाळला जातो?

अ)घोडा ब) कुत्रा क) ससा ड) डुक्कर

9) कोणता प्राणी घरी सहज पाळता येतो?

अ)सिंह ब)मांजर क) हत्ती ड) बिबट्या

10) खालीलपैकी कोणत्या प्राण्याचा उपयोग दुधासाठी नाही?

अ) गाय ब)मेंढी क) शेळी ड) घोडा

11) कोणता प्राणी अंडी घालतो?

अ) कोंबडी ब) गाय क) मेंढी ड) घोडा

प्रश्न 2 रा रिकाम्या जागा भरा.

12) _______घराचे राखण करतो.

अ) कुत्रा ब)शेळी क) मेंढी ड) गाय

13) _________चे दुध औषध म्हणून वापरतात

अ) मांजर ब)शेळी क)कुत्री ड)डुक्कर

14) लोकर मिळविण्यासाठी _____पाळतात.

अ) म्हैस ब)मांजर क)मेंढी ड) कुत्रा

15) कुबड _____प्राण्याला असते

अ)वाघ ब)सिंह क) उंट ड) चित्ता

16) गाईपासून आपल्याला____ मिळते.

अ) दूध ब)मांस क) अंडी ड) लोकर

17) शेतात कष्ट करणारा प्राणी_____ आहे.

अ)म्हैस ब) गाय क) बैल ड) रेडा

18) घरात पाळत असणाऱ्या प्राण्यांना____ प्राणी म्हणतात.

अ)पर्वतीय ब) जंगली क) पाळीव ड) मैदानी

19) पाळीव प्राण्यांना _______द्यावे लागते.

अ) अन्न व पाणी ब) कपडे क) मोबाईल ड) खेळणी

20) पक्षांना खायला_____ __देतात.

अ) धान्य ब) गवत क) चारा ड) मोबाईल

21) जंगलात राहणाऱ्या प्राण्यांना_______ प्राणी म्हणतात.

अ) पाळीव ब) जंगली क) गोठ्यातील ड) मैदानी

22) ससा ________खातो .

अ)अंडी ब)मांस क)गवत ड) मटन

23) आम्ही पाळीव प्राण्यांना_______ ठेवले पाहिजे.

अ) स्वच्छ   ब) रोगी   क) दाबून   ड) अस्वच्छ

24) खालील चित्रांचे निरीक्षण कर तुला योग्य वाटत असलेल्या चित्रांना चौकटीमध्ये (√) अशी व चूक वाटणाऱ्या चित्रांच्या समोरील चौकटीमध्ये(×) अशी खूण कर .



25) घरात पाळलेल्या प्राण्यांची स्वच्छता तू कसे करशील?

26) तुझ्या घरात पाळलेले प्राणी आजारी झाल्यास तू काय करशील?

27) तुझ्या घरात पाळलेल्या प्राण्यांना कोणत्या प्रकारचा आहार देता?

पाठ 3 रा :- परसातील झाडे

अध्ययन निष्पत्ती :- 1)परिसरातील वनस्पती ओळखशील.

2) वनस्पतींच्या मुख्य भागांची नावे सांगशील

3) वनस्पतींची उंची पानांचा आकार फुलांचा रंग इत्यादी तुलना करू शकशील.

प्रश्न 1ला योग्य पर्याय निवडा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या?

1) खालीलपैकी कोणते झाड आपल्या अंगणात सहज दिसते?

अ) नारळ ब) चंदन क) सागवान ड) देवदार

2) पपईझाडाचे फळ कशासाठी प्रसिद्ध आहे ?

अ लाकूड ब औषध क अन्न ड फूल

3) खालीलपैकी कोणता वृक्ष सावलीसाठी लावतात?

अ गुलाब ब तुळस क वड ड कांदा

4) खालीलपैकी फळझाड कोणते?

अ चिंच ब वड क गुलमोहर ड अशोक

5) आपल्याला झाडांचे संरक्षण का करावे लागते?

अ त्यांची पाने गळतात ब ते सुंदर दिसतात
क आपल्याला उपयोगी असतात ड ते आवाज करतात

6) फळझाडांचे उदाहरण कोणते?

अ आंबा ब वड क गुलाब ड नारळ

7) झाडापासून आपल्याला काय मिळते?

अ साखर　　ब फळे　　क मीठ　　ड तेल

8) खालीलपैकी औषधी वनस्पती कोणती ?

अ तुळस　　ब गुलाब　　क केवडा　　ड आंबा

9) झाडावर कोणते प्राणी राहत असतात?

अ मासे　　ब साप　　क पक्षी　　ड कासव

10) झाडे वाढण्यासाठी काय आवश्यक आहे ?

अ लाकूड　　ब हवा पाणी व प्रकाश　　क शंख　　ड दगड

11) आपले घर थंड ठेवण्यास कोण मदत करते?

अ) रंग　　ब टाईल्स　　क झाडे　　ड पंखा

प्रश्न 2 रा रिकाम्या जागा भरा.

13) तुळस ही एक_______ वनस्पती आहे

अ लाकूड　　ब औषधी　　क रंगदेणारी　　ड चमकणारी

14) __________ही एक वेल आहे

अ कोबी　　ब तुळस　　क भोपळा　　ड वांगी

15) वडाचे झाड _______साठी प्रसिद्ध आहे

अ सावली　　ब दुर्गंधी　　क घाणी　　ड वायू

16) झाडे आपल्याला_______ देतात

अ माती　　ब दगड　　क वाळू　　ड वायू

17) वेल झाडापेक्षा________असतात

अ) उंच　　ब रूंद　　क लहान　　ड मोठे

18) झाडावर________ राहतात.

अ) पक्षी　　ब गाढव　　क घोडे　　ड लोक

19) झाडालाआधारदेणाराभाग______म्हणजेहोय.

अ पान　　ब फूल　　क फळ　　ड खोड

20) आकाराने लहान असणाऱ्या वनस्पतींना______म्हणतात

अ रोप　　ब झुडपे　　क झाड　　ड बांबू


21) आकाराने मोठ्या व उंच असणाऱ्या वनस्पतींना _______ म्हणतात.

अ रोप　　ब झुडपे　　क झाड　　ड वेल

प्रश्न 3 रा 22) मला ओळख व माझे नाव लिही ?



23) झाडाचे भागओळख व दिलेल्या जागेत नाव लिही?



प्रश्न 4 था जोड्या जुळवा

अ गट	ब गट
24) कमळ	अ) सूर्याकडे तोंड करून उगमते
25) सुर्यफुल	ब) रात्री उमलणारे फुल
26) ब्रह्मकमळ	क) केसात घालतात
27) फुले	ड) मध गोळा करते
28) मधमाशी	ख) लाल व पाच कळ्यांचे असते
29) जास्वंद	ग) झाडाचा रंगीत भाग
30) फुले	च) जमिनीवर पसरते
31) भोपळा	छ) फळ देणारी वेल
32) द्राक्ष	ज) आधार लागतो
33) वेल	झ) वेल नव्हे
34) तुर	ट) वेलीला लागते
35) काकडी	ठ) वेलीला आधार लागतो
36) टोमॅटो	ड) जमिनीत पसरतात
37) मुळे	ढ) अन्न तयार करतात
38) पाने	त) रोपाला आधार देतो
39) खोड	थ) झाडाच्या वाढीस मदत करतात
40) खते	द) पाण्यात उगम पावते

पाठ 4 था :- आम्ही आहोत तुमच्यासाठी

अध्ययन निष्पत्ती :- 1) दैनंदिन गरजांसाठी आम्ही वनस्पतीवर अवलंबून असतो हे समजून घेशील.

1. हे कोणते फळझाड आहे सांग.



2. नारळाचे उपयोग लिहा.

3. नारळाच्या झाडापासून इतर कोणते उपयोग होतात?

4. खराटा तयार करण्यासाठी कशाचा वापर करतात?

5. नारळाच्या कात्याचा उपयोग कशासाठी करतात?

6.हे झाड तू कधी पाहिले आहेस का?



7. हे कोणत्या फळाचे झाड आहे?

8.केळीचा उपयोग कशासाठी करतात?

9.केळीच्या पानाचा उपयोग कोणकोणत्या कार्यासाठी केला जातो?

10.तुला माहित असलेल्या पाच फळझाडांची नावे लिही.

11.फळांचा उपयोग कशासाठी केला जातो?

12.तुला आवडणाऱ्या फळाचे चित्र काढून रंग भर.

13.तुझ्या परिसरात आढळणाऱ्या फळझाडांची नावे लिही.



14.वरील चित्रात आढळणाऱ्या भाज्या धान्य व फळे यांची यादी करा.

15.तुला माहित असलेल्या भाज्यांची ,फळांची व धान्यांची यादी कर.

16.तुला माहित असलेल्या फुलांची यादी कर.

17.फुलांचा उपयोग कोणकोणत्या कार्यासाठी केला जातो?

18.तुला आवडत्या फुलाचे चित्र काढून रंगभर.

19.तुझ्या परिसरात आढळणाऱ्या फुलांची यादी कर.

20.अंगणात असणारी औषधी वनस्पती कोणती?

21.तुळशीचा उपयोग कोणकोणत्या रोगासाठी करतात?

22.तुझ्या घरात तुळशी चा उपयोग कोणकोणत्या कार्यासाठी करतात?

23.तुळशी बरोबरच इतर कोणकोणत्या औषधी वनस्पती आहेत?


24.तुला माहित असलेल्या औषधी वनस्पतींची यादी कर.

25.कडुलिंबाचे उपयोग कोणकोणते आहेत?

26.आपल्याबरोबरच इतर प्राण्यांना वनस्पतीचा कोणता उपयोग होतो?

27.कोणकोणते प्राणी आहारासाठी वनस्पतीवर अवलंबून आहेत?

28. उपयोग ओळखून जोड्या जुळवा.



पाठ 5 वा :- अमूल्य पाणी

अध्ययन निष्पत्ती – 1) सभोवताली पाणी कोठे कोठे मिळते हे समजून घेशील

2) पिण्यासाठी शुद्ध पाण्याची आवश्यकता आहे हे समजून घेशील

3) पाण्याचा साठा आणि त्यांचा वापर याबद्दल जाणून घेशील


4) प्राणी व वनस्पतीना पाण्याची आवश्यकता आहे हे समजून घेशील


1. पाण्याचे उपयोग कोणकोणते याची यादी कर.

2. आपणाला पाणी कुठून मिळते?

3. तुझ्या घरात पाणी कुठून आणता?


4. चित्रांमध्ये दिसणारे पाण्याचे उपयोग लिहा.





5. खालील चित्रामध्ये पाण्याचे स्त्रोत दिले आहेत. तक्त्यामध्ये तुझे मत नोंदव.





पाणी मिळण्याचे ठिकाण	पाहिले आहे	वापर करतात	कोणत्या कामासाठी

6. तुझ्या गावांमध्ये मिळणारे पाणी कोणत्या स्त्रोतापासून मिळते?

7. पिण्यासाठी कोणते पाणी वापरावे?

8. खालील चित्रातील क्रम क्रमाने लाव.



9. तुझ्या शाळेमध्ये वापरले जाणाऱ्या पाण्याचे स्त्रोत समजून लिही.

10. कपडे धुण्यासाठी कोणत्या पाण्याचा वापर करतात?

11. शुद्ध व अशुद्ध पाणी याचे शरीरावर होणारे दुष्परिणाम कोणते.खालील चित्रातील गोष्टीवरून सांग.






12. अशुद्ध पाणी शुद्ध कसे करता येते हे खालील चित्रावरून सांग.



13. तुझ्या घरामध्ये शुद्ध पाणी कोठून आणता?

14. आपल्यासारखेच आणि कोणाकोणाला पाणी हवे आहे?

15. चित्रामध्ये पाण्याची आवश्यकता कोणाकोणाला आहे याची यादी कर.



16. तुझ्या शाळेसमोरील झाडे सूकत आहेत तू काय करशील?

17. इतर प्राण्यांनाही पाण्याची आवश्यकता आहे म्हणून तू काय करशील?

पाठ 6 वा :- आहाराची विविधता

अध्ययन निष्पत्ती : - 1) वनस्पती व प्राण्यांपासून मिळणारे आहार पदार्थ ओळखशील

2) घरातील वेगवेगळ्या आहार सवयी समजून घेशील

3) कच्चे व शिजवून खाणारे आहार पदार्थ ओळखशील

4) प्राण्यांच्या आहारासंबंधी समजून घेशील


5) स्वयंपाकासाठी लागणाऱ्या विविध भांड्यांची नावे सांगशील

1. तुला भूक लागल्यानंतर तू काय खातोस याची यादी कर.


2. आहार पदार्थ का सेवन केला पाहिजे?

3. चित्रातील आहार पदार्थ आपणाला कोणाकडून मिळतो.




नाचणा
बाजर
बीट
केळी
हरभरा
कोबी
काकडी
वांगी
बटाटा
पडवळ
भेंडी
भोपळा
कारले
मूळा
पालक


4. खालील चित्रातील आहार पदार्थ आपणाला कोणाकडून मिळतो.



5. वनस्पतीजन्य आहार पदार्थ कोणत्या रंगाने दर्शवतात?

6. प्राणीजन्य आहार पदार्थ कोणत्या रंगाने दर्शवतात?

7. खालील चित्रातील आहार पदार्थ वनस्पतीजन्य व प्राणीजन्य योग्य त्या रंगाने रंगवा.



8. वनस्पती पासून मिळणाऱ्या आहार पदार्थांची यादी करा.

9. पाण्यापासून मिळणाऱ्या आहार पदार्थांची यादी करा.


10. आपण कोणत्या कच्च्या भाज्या खातो यांची यादी कर.

11. तुला आवडत्या कच्च्या भाजीचे चित्र काढून रंगव.

12. आपण कोण कोणती कच्ची फळे खातो?

13. तुला आवडनाऱ्या फळांची नावे लिही.

14. खालील चित्रातील फळे व भाज्या ओळख.



15. आपण काही आहार पदार्थ कच्चे व शिजवून खातो त्याची यादी कर.

16. वनस्पती व प्राण्यांपासून मिळणाऱ्या आहार पदार्थांची चित्रे संग्रह कर.

17. तुझ्या घरात वापरल्या जाणाऱ्या आहार पदार्थांची यादी कर.

18. तुला आवडणारे आहार पदार्थ कोणकोणते?

19. रात्रीच्या जेवणात तुझ्या घरात कोणते आहार पदार्थ असतात?

20. दुपारच्या जेवणात तू कोणकोणते आहार पदार्थ खातोस?


21. बनवण्यासाठी कोणकोणती भांडी वापरतात याची यादी कर

22. तुझ्या घरात असणाऱ्या भांड्यांची यादी कर.

23. खालील चित्रामध्ये कोण कोणती भांडी आहेत ओळखून लिही.




24.प्राण्यांचे आहार पदार्थ ओळख



25.तुझ्या सभोवताली असणारे प्राणी व त्याचे आहार पदार्थ लिही.

26 खालील चित्रामध्ये प्राण्यांचा आहार पदार्थ दाखवा.



27. शाकाहारी व मांसाहारी प्राणी म्हणजे काय?

28. मिश्रहारी प्राणी म्हणजे काय?

पाठ 7 वा :- **घर हवे घर**

अध्ययन निष्पत्ती : - 1 घराची आवश्यकता जाणून घेशील एकत्रित राहण्याची आवश्यकता जाणून घेशील

2 सामान्यपणे घरातील वेगवेगळया भागांची ओळख करून घेशील

3 घरात तयार होणाऱ्या विविध प्रकारच्या कचऱ्याची माहिती होईल त्यांच्या विल्हेवाटीचा क्रम समजून घेशील

4 पुढे मागे डावीकडे उजवीकडे या शब्दांचा उपयोग करून घराच्या सभोवतालच्या दृश्याची ओळख करून घेशील

1) जोड्या जुळवा



2) रिकाम्या जागा भरा

1) तुझ्या घराला . . . . दरवाजे आहेत.

2) तुझ्या घराला . . . . खिडक्या आहेत.

3) तुझ्या घराच्या मागे . . . . आहे.

4) तू हात पाय तोंड . . . . येथे धुतोस.

5) घरातील कचरा. . . . . येथे टाकतात.



3) वरील चित्राचे निरीक्षण कर आणि पुढील प्रश्नांना उत्तरे दे

1) चित्रांमध्ये कोण कोण राहतात?

2) चित्रांमध्ये झाडाला पाणी कोण देते?

3) चित्रामध्ये फुले कोण तोडत आहेत?


4) कुत्र्याला भाकरी कोण देत आहे?

5) तुझ्या घराची स्वच्छता कोण करते?

4) खालील प्रश्नांची उत्तरे दे (तोंडी उत्तरे घेणे)

1) घर बांधण्यासाठी कोण कोणते साहित्य हवे
2) घराची आवश्यकता का आहे
3) तुझे घर कसे स्वच्छ ठेवशील

5) टिपक्या जोडून चित्र तयार कर आणि योग्य रंग भर




पाठ 8 वा :- शरीराचे अवयव व आरोग्य

अध्ययन निष्पत्ती : - 1 शरीराचे भाग ओळखून त्यांचे कार्य समजून घेशील

2 उत्तम आरोग्यासाठी वैयक्तिक स्वच्छतेच्या आवश्यकतेचे महत्त्व समजून घेशील


1) चित्र पाहून रेषा ओढलेल्या भागांना चौकटीत नावे दे



2) अवयवांचे कार्य ओळखून जोड्या जुळव

अ) पळणे	
ब) वास घेणे	
क) ऐकणे	
ड) अन्न चावणे	
इ) पहाणे	

3) चित्र पाहून रिकाम्या जागा भरा

	दररोज .. . . करणे
	सकाळी लवकर उठून . . . . घासणे
	जेवणाआधी व नंतर स्वच्छ . . . . . धुणे
	आठवड्यातून एकदा . . . . . . कापणे
	दररोज . . . . करतात

4) चूक की बरोबर खून करून दाखवा

1) नाकात काडी पेन्सिल घालावे

2) कानात काडी पेन्सिल घालू नये

3) सकाळी उठून तोंड धुवावे

4) डोळयात धुळ गेल्यास चोळू नये

5) हाताला बोटे 10 आहेत

5) खालील प्रश्नांची उत्तरे द्या तोंडी

1) शाळेला येण्याआधी तुम्ही काय करता
2) शाळेतून घरी गेल्यावर काय काय करता
3) रात्री झोपण्या अगोदर आपण काय करतो
4) आपल्याला पाणी कशासाठी हवे
5) तुझी पूर्ण वाढ होण्यासाठी योग्य सवयी कोणत्या
6) दररोज किती तास झोपता
7) दररोज किती तास अभ्यास करतोस

पाठ 9 वा :- माझी सुरक्षितता

अध्ययन निष्पत्ती : -1 स्थानिक परिसरातील वैयक्तिक सुरक्षतेच्या साध्या सोप्या गोष्टी समजून घेशील

1. **घरामध्ये वापरणाऱ्या वस्तूंची चित्रे पाहून नावे दे**



2. चित्रातील कृती पाहून चूक की बरोबर लिहा



3. खालील घटनेत तुझे कार्य सांग

1) शाळेच्या मैदानात काटे पडले आहेत

2) रस्त्यात कुत्रा उभा राहिला आहे

3) रस्त्यावर काचा पडल्या आहेत

4) घरामध्ये विद्युत इस्त्री गरम आहे

5) घरामध्ये चुलीवर दूध उतू जात आहे

6) विळतीने भाजी चिरावयाची आहे

7) तुझ्या मित्राच्या पायात काटा टोचला आहे

8) फटाके उडवताना कोणती काळजी घेशील

9) रस्त्यावर केळीची साल पडली आहे

10) ब्लेड वापरताना बोट कापले आहे

4. चूक की बरोबर लिहा

1) रस्त्याच्या मधोमध चालावे

2) मित्राला जखम झाल्यास प्रथमोपचार करावे

3) धारदार वस्तूने कापल्यास कोणालाही सांगू नये

4) फटाके भरपूर फोडावेत

5) काचेचे तुकडे ब्लेड मैदानात टाकू नये

पाठ 10 वा :- आम्हा सर्वांची संपत्ती

अध्ययन निष्पत्ती:- 1) सार्वजनिक संपत्तीची ओळख करून घेशील व त्यांच्या आवश्यकतेविषयी वडीलधाऱ्याकडून समजून घेशील .

प्रश्न 1 ला योग्य पर्याय निवडा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या . बरोबर उत्तरासमोर (√) करा

1) शाळा कोणासाठी असते?

अ) एका व्यक्तीसाठी ब) एका कुटुंबासाठी क) सर्वांसाठी ड) शिक्षकांसाठी

2) आम्हा सर्वांची संपत्ती म्हणजे काय?

अ)खासगी मालमत्ता ब) सरकारची फक्त

क) सर्व लोकांसाठी असलेली मालमत्ता ड) दुकानदारांची मालमत्ता

3) सार्वजनिक बागेत कोण जाऊ शकतो?

अ)फक्त मुले ब) फक्त मोठे क) सर्वजण ड) शाळेचे विद्यार्थी

4) सार्वजनिक संपत्तीची काळजी कोणी घेतो?

अ)आपल्यापैकी प्रत्येकाने ब) पोलीस क) डॉक्टर ड) शिक्षक

5) सार्वजनिक रुग्णालयात कोण जातात?

अ)शिक्षक ब) व्यापारी क)आजारी लोक ड) खेळाडू

6) आपण सार्वजनिक संपत्तीचे काय करावे?

अ) नुकसान ब) दुर्लक्ष क) जपून वापरावे ड) विकावे

7) सार्वजनिक संपत्तीचा उपयोग कोण करतो?

अ) पोलीस ब)डॉक्टर क) सर्व नागरिक ड) गावचे प्रमुख

8)सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले तर काय होईल?

अ) काहीच नाही ब)सर्वांचे नुकसान होईल

क) फायदा होईल ड)नवीन मिळेल

9) शाळेतील शालेय साहित्य कशाचे उदाहरण आहे?

अ) खाजगी ब) सार्वजनिक संपत्ती

क) शेतमाल ड) दुकानदाराचे

10) सार्वजनिक संपत्ती मध्ये खालीलपैकी कोण येते?

अ) खेळणी ब) बाग क) फळे ड) टीव्ही

प्रश्न 2 रा चूक की बरोबर लिहा .

11) सार्वजनिक नळाचे पाणी जपून वापरावे.

12) सार्वजनिक वाचनालयातील पुस्तके फाडावीत.

13) बस स्थानक मध्ये थुंकावे.

14) बस मध्ये स्वच्छता राखावे.

15) सार्वजनिक बागेत कचरा टाकावा.

16) शाळेतील खुर्ची व मेज मोडावेत.

17) बागेतील फुलझाडे तोडावेत.

18) शाळेत जोरात दंगा घालावा.

19) सरकारी दवाखान्यात आरडाओरडा करू नये.

20) रस्त्याकडेला लावलेली दिवे फोडावीत.


21) स्वस्त धान्य दुकानातील धान्य घेताना रांगेने घ्यावे.

22) बागेतील पक्षांना दगड मारू नये .

23) शाळा स्वच्छ ठेवावे.

प्रश्न 3 रा खालील चित्रे जोडा

24) शाळा	

25) दवाखाना	
26) बस स्थानक	
27) रस्ता	
28) पोस्ट ऑफिस	
29) नळ	

पाठ 11 वा :-   प्रवास

अध्ययन निष्पत्ती :- 1)प्रवासांच्या साधनापैकी वेगाने धावणारी आणि हळू धावणाऱ्या वाहनांचे वर्गीकरण करशील.

2)जमिनीवरून पाण्यातून व हवाई मार्गे जाणारी वाहने ओळखशील.

प्रश्न 1 लायोग्य पर्याय निवडा आणि खालील प्रश्नांच्या उत्तरासमोर [√] करा.

1).खालीलपैकी वेगाने धावणारे वाहन कोणते?

अ) सायकल   ब)बैलगाडी   क) कार   ड) घोडागाडी

2) प्रवास म्हणजे काय?

अ) खेळणे   ब) चालणे

क) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे   ड)झोपणे

3) खालीलपैकी प्रवासाचे साधन कोणते ?

अ) टीव्ही   ब)मोटार   क) घर   ड) शाळा

4) रेल्वेने प्रवास कोण करतो?

अ)झाड   ब) माणसे   क) मासे   ड) पाखरे

5) पाण्यातील प्रवासाचे साधन कोणते?

अ) सायकल   ब) रिक्षा   क) होडी   ड) विमान

6) रस्त्यावर कोणते वाहन चालते?

अ) बोट   ब) विमान   क) बस   ड) जहाज

7) विमान कुठे उडते ?

अ) पाण्यात   ब) जमिनीवर   क) आकाशात ड) मातीमध्ये

8) सायकल चालवण्यासाठी काय लागते?

अ)पेट्रोल   ब)डिझेल   क)पायाची ताकद   ड) कोळसा

9) खालीलपैकी जमिनीवर धावनारे वाहन कोणते?

अ)जहाज   ब)विमान   क) ट्रक   ड) हेलिकॉप्टर

10) रस्ता कोणासाठी असतो?

अ)फक्त गाड्यांसाठी   ब)गाड्या आणि माणसे

क) पक्षासाठी   ड)फक्त प्राण्यासाठी

11) सार्वजनिक प्रवास साधन कोणते?

अ) दुचाकी   ब) कार   क)बस   ड) सायकल

12) रिक्षाला किती चाके असतात?

अ) दोन   ब)पाच   क) चार   ड) तीन

प्रश्न 3रा जोड्या जुळवा

13) बैलगाडी	अ) रुळावर
14) रेल्वे	ब) बैल
15) घोडागाडी	क) रस्त्यावर
16) बस	ड) घोडा
17) विमान	इ) आकाशात
18) होडी	ई) पाण्यावर
19) जहाज	उ) समुद्रात

प्रश्न 4था रिकाम्या जागा भरा

20) प्रवास म्हणजे एका ठिकाणाहून ____________ठिकाणी जाणे.

21) पाण्यावर चालणारे वाहन___________

22) आकाशात उडणारे वाहन ___________

23) रेल्वे___________ वर चालते.

24) बस __________ वर चालते.


25) बैलगाडी ओढण्यासाठी ___________लागतात.

26) सार्वजनिक प्रवासाचे साधन ___________

27) रिक्षा चालवतो ____________

प्रश्न 5वा

28) चित्रातील वाहनांची नावे दिलेल्या चौकोनात लिहा.



29) वरील चित्रातील कोणती वाहने सावकाश कोणती वाहने वेगाने जातात त्या रकान्यात (√) कर

अ.नं.	वाहनाचे नाव	सावकाश जाणारे	वेगाने जाणारे
1	सायकल		
2	बैलगाडी		
3	बस		
4	रेल्वे		
5	विमान		
6	ट्रक		
7	घोडागाडी		
8	मोटरसायकल		
9	ऑटो रिक्षा		
10	जहाज		

प्रश्न 6 वा जोड्या जुळवा

अ गट	ब गट
30) जमिनीवरून जाणारे वाहन	अ) विमान
31) पाण्यावरून जाणारे वाहन	ब) बस
32) हवेतून जाणारे वाहन	क) जहाज
33) रुळावरून जाणारे वाहन	ड) रेल्वे

पाठ 12 वा :- माझे कुटुंब

अध्ययन निष्पत्ती : - 1)कुटुंबात असलेली वैविधता ओळखशील.

2)कुटुंब ही एक आधार व्यवस्था याची जाणीव करून घेशील.

3)आम्ही दुसऱ्या प्रमाणेच आहोत तरीसुद्धा वेगळे आहोत हे समजून घेशील.

प्रश्न 1ला योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे द्या

1) आपल्या कुटुंबात कोण असतो?

अ) फक्त मित्र ब) शिक्षक

क) आपले आई-वडिल आणि भावंडे ड)शेजारी

2) कुटुंबात आपल्याला काय मिळते?

अ)शिक्षा ब)प्रेम आणि काळजी

क) पैशांची मागणी ड) तक्रारी

3) मोठ्या कुटुंबात कोण असतात ?

अ) फक्त आई ब) फक्त आजोबा

क) आई वडील आजोबा आजी काका काकू ड) शेजारी

4) लहान कुटुंबात कोण असतात?

अ) फक्त आई ब) फक्त बाबा

क) फक्त आजोबा ड) आई वडील व मुले

5) लहान कुटुंबात कोण नसतात?

अ)आई　　ब) बाबा　　क) भाऊ　　ड) काका, काकू

6) लहान कुटुंबात किती सदस्य असतात?

अ)दहा　　ब)दोन ते चार　　क) आठ　　ड) शून्य

7) आपले कुटुंब कोणते गुण शिकवते?

अ)खोटे बोलणे　　ब) शिवी देणे

क) मारणे　　ड) प्रेम स्नेह एकमेकांची मदत

प्रश्न 2रा चूक की बरोबर लिहा.

8) माझे आई-वडील माझ्याशी प्रेमाने बोलतात.

9) शेजाऱ्यांना मदत करू नये.

10)कुटुंब आपल्याला चांगले संस्कार शिकवते.

11) घरातील आजी व आजोबांची सेवा करू नये.

12)मोठ्या कुटुंबात सदस्य जास्त असतात.

13)आई-वडील आपली काळजी घेत नाहीत.

14)लहान कुटुंबात सदस्य कमी असतात.

15)मी आजारी असताना बाबा मला दवाखान्याला घेऊन जातात.

16)आई अभ्यास करण्यास मदत करत नाही.


17)माझा भाऊ व बहीण माझ्याबरोबर खेळतात.

18)आई वडील माझ्या कामात मदत करतात.

जोड्या जुळवा

अ गट	ब गट
19) आई-वडील	प्रेम व सुरक्षा
20) मोठे कुटुंब	कमी सदस्य
21) लहान कुटुंब	वृद्ध सदस्य
22) आजोबा आजी	जास्त सदस्य
23) कुटुंबात मिळते	आपले पालक

24) खालील चित्रामधील जास्त सदस्य असणाऱ्या कुटुंबाच्या चित्राला (√)अशी खूण कर .



25) खालील चित्रे बघ व प्रत्येक कुटुंबात असलेल्या सदस्यांची संख्या मोजून लिही.



पाठ 13 वा :- सण आणि समारंभ

अध्ययन निष्पत्ती : - आपल्या कुटुंबातील / नातेवाईकांच्या कुटुंबातील समारंभात भाग घेतल्याबद्दल अहवाल सादर करशील .

1.तुझा वाढदिवस कधी असतो?

2.तू कधी लग्न समारंभाला गेला आहेस का?

3.लग्न आणि सणसमारंभामध्ये आपणाला कोणकोण भेटतात?

4.खालील चित्रातील समारंभ ओळख व लिही



5.तुझा वाढदिवस कसा साजरा करतात?

6.खाली दिलेल्या चित्रातील रिताच्या वाढदिवसाची गोष्ट सांग.



7.वाढदिवसातील कोणता क्षण तुला जास्त आवडतो?

8.तू कधी तुझ्या मित्राच्या वाढदिवसाला गेला आहेस का?

9.तुझ्या एखाद्या मित्राच्या वाढदिवसासाठी गेलेल्या गोष्टी सांग.

10.आपण कोण कोणते सण साजरे करतो?

11.विविध धर्माचे सण कोणते आहेत?

12.खालील दिलेल्या चित्रातील सण सांग?



13.तुझा आवडता सण कोणता?

14.दिवाळीचा सण आपण कसा साजरा करतो?

15.दिवाळीला तुझ्या घरी कोणकोणते फराळ बनवतात?

16.तुझा आवडता फराळ कोणता?

17.मुसलमानांचा पवित्र सण कोणता?

18.ईद-उल-फित्र सण कधी साजरा करतात?

19.रमजान सणामध्ये किती दिवस उपवास करतात?


20.ख्रिसमस हा कोणत्या धर्माचा सण आहे?


21.ख्रिसमस सण कधी साजरा करतात?


22.ख्रिसमस हा कोणाचा जन्मदिवस आहे?

23.ख्रिसमस दिवशी कोणता गोड पदार्थ वाटतात? ख्रिसमस दिवशी कशा शुभेच्छा दिल्या जातात?

24.खालील चित्रे पाहून त्या सणांची नावे लिही.







25.आपले राष्ट्रीय सण कोणते?


26.स्वातंत्र्य दिन म्हणजे काय?


27.प्रजासत्ताकदिन म्हणजे काय?

28.तुझ्या शाळेतील स्वातंत्र्य दिनाचे वर्णन कर.

29.तुझ्या शाळेत प्रजासत्ताक दिन कसा साजरा करतात?

30.खालील चित्रामध्ये रंग भर.







पाठ 14 वा :- वडीलधाऱ्यांची काळजी

अध्ययन निष्पत्ती :- रोगी,आजारी तसेच वयस्करांना मदत करण्याची,तसेच त्यांना सहाय्य करण्याची मनोभावना तुझ्यात वाढीस लागेल.

1. तुझ्या कुटुंबातील सदस्यांची नावे सांग?


2. तुझ्या आजी-आजोबांना तू मदत करतोस का?

3. चित्रामध्ये राजूने आजीला कशी मदत केली?




4. तू तुझ्या आजी आजोबांना कशी मदत करतोस?

5. चित्र पाहून ते कसे मदत करत आहेत सांग.



6. आपण इतर वयस्कर माणसांना कशी मदत करू शकतो?

7. खालील चित्रातील योग्य चित्रांना बरोबर [✓]अशी खूण कर.



8. आजी आजोबांचे पाय दुखत असतील तर तू काय करशील?

9. मित्राबरोबर खेळत असताना मित्र पडल्यास तू काय करशील?

10.वयस्क व आजारी व्यक्तींना मदत का केली पाहिजे?

11. तुझे आजी आजोबा आजारी असताना त्यांना कशी मदत करतोस?

12. आजी आजोबांशी कसे वागावे?

13. घरामध्ये कोणी नसताना तू आजी-आजोबांना कशी मदत करशील?

14. घरामध्ये कोणी आजारी असल्यास टीव्ही चा आवाज का वाढवू नये?

15. तुला इतरांना मदत करायला आवडते का.

16. इतरांना मदत केलेला एखादा प्रसंग सांग.

17. खालील चित्रातील प्रसंगासमयी तू काय करशील?



पाठ 15 वा :- सहाय्य – सहकार्य

अध्ययन निष्पत्ती :- घरात कोण कोण काय काय काम करतात? हे जाणून घेशील.


1. तुझ्या घरामध्ये कोणकोणती कामे केली जातात?

2. तुझ्या घरातील कामे कोण कोण करतात?

3. घरातील कामे करण्यास कोण कोण मदत करतात?

4. तू घरातील कोणकोणती कामे करतोस?

5. खालील चित्रात रामाच्या घरातील कामे दिली आहेत कोण काय काम करत आहे ते लिही.

<table>
<tr><td></td><td rowspan="4">
* बागेला पाणी घालत आहे.
* फुले तोडत आहे.
* केस विंचरत आहे.
* पुस्तके व्यवस्थित ठेवत आहे.</td></tr>
<tr><td></td></tr>
<tr><td></td></tr>
<tr><td></td></tr>
</table>

6. तुला घरातील कोणती कामे करायला आवडतात?

7. खालील चित्रात ममताच्या घरातील विविध कामे करत असलेली दिली आहेत ते पाहून खालील प्रश्नांची उत्तरे दे.



8. ममताच्या घरात कोण कोणती कामे केली जात आहेत?

9. ममता ची आई काय काम करत आहे?

10. आई जेवण बनवत असताना ममता व तिचे वडील काय करत आहेत?

11. तुझी आई जेवण बनवत असताना तुम्हीही अशी मदत करता का?

12. ममता काय स्वच्छ करत आहे?

13. ममता चा भाऊ काय स्वच्छ करत आहे?

14. तुम्हीही घराची अशी स्वच्छता करता का?

15. घराची सजावट कशी केली जात आहे?

16. तुला हार बनवता येतो का?

17. हार बनवण्यासाठी कोण कोणते साहित्य लागते?

18. ममताचे कुटुंब बागेमध्ये काय करत आहे?


19. तुझ्या शाळेसमोर किंवा घरासमोर बाग आहे का?

20. तू बागेमध्ये कोण कोणती कामे करतोस?

21. सर्वजण मिळून काम केल्याने कोणता फायदा होतो?

22. सर्वांनी मिळून काम केले नाही तर काय होईल?


23. खालील चित्रातील तू कोणकोणती कामे करतोस त्यासमोर बरोबर[✓] अशी खूण कर.



24. खालील चित्रात कोण काम करत आहे यांच्या जोड्या जुळवा.



25. तू खालील कामे करत असल्याचा अभिनय कर.



खालील कामे करत असल्याचा अभिनय कर.

* विहीरीतून पाणी ओढणे.
* झाडांना पाणी घालणे
* लाकूड तोडणे.
* भांडी धुणे.
* कपडे धुणे.
* कचरा काढणे.
* भाजीपाला कापणे.
* केस विंचरणे.

पाठ 16 वा :- चला खेळू

अध्ययन निष्पत्ती : - 1 घरात व घराबाहेर खेळावयाच्या खेळाची यादी करशील

1) पुढील चित्राचे निरीक्षण करून तुझ्या ओळखीच्या खेळांना नावे दे?





2)

3) (अंतरांगन) आत आणि (मैदानी) बाहेर खेळावयाचे खेळ ओळखून लिही

1) सरी पाठ
2) कॅरम
3) लंगडी
4) लगोरी
5) क्रिकेट
6) रस्सीखेच
7) कबड्डी
8) विटी - दांडू
9) साप - सीडी
10) भोवरा
11) हॉलीबॉल
12) थ्रो बॉल
13) दोरी उड्या
14) हॉकी
15) फुटबॉल
16) लपंडाव

4) खालील प्रश्नांना उत्तरे दे

1) कबड्डी खेळ कोठे खेळतात?

2) क्रिकेट खेळामध्ये किती खेळाडू असतात?

3) आपल्या देशाचा खेळ कोणता?

4) बुद्धिबळामध्ये खेळामध्ये किती सोंगट्या असतात?

5) सापशिडी खेळामध्ये वापरणाऱ्या संख्या दर्शकाचे नाव काय?


6) कॅरम खेळामध्ये मारावयाच्या वस्तूला काय म्हणतात?

7) क्रिकेट खेळण्यासाठी आवश्यक साहित्य कोणते?

8) दोन ग्रामीण खेळांची नावे सांग?

5) पुस्तकात दिलेली कविता पाठ कर आणि म्हणून दाखव

6) टिपके जोडून रेखाचित्र तयार कर व रंगभर



पाठ 17 वा :- आम्हाला हे पाहिजे

अध्ययन निष्पत्ती : - 1 तुम्हाला तुमच्या गरजांची जाणीव होईल

1) खालील प्रश्नांची उत्तरे दे

1) आपल्या गरजा कोणत्या यादी कर?

2) बाजारातून आपण कोणकोणत्या वस्तू आणतो?

3) शाळेची आवश्यकता काय आहे?

4) पिण्याचे पाणी कोठून आणता?

5) आपल्याला दवाखान्याची काय गरज आहे?

6) तुमच्या घरात तांदूळ गहू साखर इत्यादी वस्तू कोठून आणता?

7) एका गावाहून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी कोणते सरकारी वाहन वापरता?

8) तुझ्या गावांमध्ये असणाऱ्या सरकारी सुविधा कोणकोणत्या?

2) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा

1) शाळेत . . . . शिकवतात.

2) आपल्याला पत्र . . . . आणून देतात.

3) डॉक्टर आपल्याला . . . . . . देतात.

4) आवश्यक असणारे वस्तू आपण. . . . . . . आणतो.

5) एका गावाहून दुसऱ्या गावाला जाताना . . . . मधून जातो.

6) आई मी शिकण्यासाठी . . . . जाते.


7) घरात भाजीपाला नाही मी . . . .   चालले.

8) घरात तांदूळ नाही ते आणण्यासाठी मी .. . . दुकानात जातो.

9) मला थंडी वाजून ताप आला आहे मी . . . .   जातो.

10) मला गावी जावयाचे आहे मला . . .   . थांब्यावर गेले पाहिजे.

3) चित्र पाहून जोड्या जुळवून



4) पुस्तकामध्ये दिलेली कविता पाठ करून म्हणून दाखव

पाठ 18 वा :- आकाशात

अध्ययन निष्पत्ती : - 1 सूर्य चंद्र तार यांचे निरीक्षण करून त्यांची लक्षणे ओळखशील

2 पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर दिशा ओळखशील

1) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा

1) सूर्य उगवणारी दिशा कोणती?

2) उगवत्या सूर्याकडे तोंड करून उभे राहिल्यास उजव्या हाताला येणारी दिशा कोणती?

3) उगवत्या सूर्याकडे तोंड करून उभे राहिल्यास डाव्या हाताशी येणारी दिशा कोणती?

4) सूर्य मावळणारी दिशा कोणती?

5) पौर्णिमेच्या रात्री आकाशात दिसणारे उपग्रह कोणते?

6) रात्री अंधारामध्ये आकाशात दिसणारे घटक कोणकोणते?

7) चंद्राच्या कला किती?

8) सूर्याच्या प्रखर प्रकाशाकडे उघड्या डोळयांनी पाहू नये का?

2) **चित्र पाहून रिकाम्या जागा भरा**



1) आपल्या उजव्या हाताकडे घर दाखवते ती दिशा . . . . .

2) नारळाचे झाड . . . .   दिशेला आहे

3) कुत्रा दिशेला . . . . आहे

4) दक्षिण दिशेला . . . . आहे

5) डाव्या हाताला . .   . . दिशा आहे

3) प्रायोगिक करून दाखव

1) शाळेच्या आवारात उभे राहून विद्यार्थ्यांना दिशा दाखवण्यास सांगणे

2) उजव्या हाताची दिशा त्या बाजूला येणारे घटकाची यादी

3) डाव्या हाताची दिशा कोणती त्या दिशेला येणाऱ्या घटकांची यादी कर

4) पाठीमागे येणारी दिशा व त्या दिशेला येणाऱ्या घटकांची यादी कर

5) सूर्याच्या स्थितीवरून सकाळ दुपार संध्याकाळ इत्यादी सांग

6) सावली आणि वेळ यांचा संबंध सांग


7) रात्रीच्या आकाशाचे निरीक्षण कर चंद्र तारे नक्षत्र ओळखून सांग

पाठ 19 वा :- माझे गाव सुंदर गाव

अध्ययन निष्पत्ती : - 1 स्थानिक भौगोलिक लक्षणे ओळखशील

2 आपला विभाग व तालुका ओळखशील

1) पुढील चित्राचे निरीक्षण करून योग्य नावे दे





2) खालील प्रश्नांची उत्तरे दे

1) तुझ्या गावांमध्ये पिण्याचे पाणी कोठून येते?

2) तुझ्या गावाच्या शेजारी कोण कोणती गावे आहेत?

3) तुझ्या गावाचे नाव काय?

4) तुझ्या गावाच्या पूर्वेला कोणते गाव आहे?

5) तुझ्या गावाच्या दक्षिणेला कोणते गाव आहे?

6) तुझ्या तालुक्याचे नाव काय?

7) तुझ्या जिल्ह्याचे नाव काय?

8) तुझ्या गावाततील मुख्य पीक कोणते?

9) तुझ्या गावाजवळ आढळणारे पक्षी कोणते?

10) तुझ्या गावाजवळ आढळणारे प्राणी कोणते?

11) तू समुद्र पाहिले आहेस का?

12) तुझ्या गावाजवळील टेकडी पाहिले आहेस का?

3) रिकाम्या जागा भरा

1) माझ्या गावाच्या उत्तरेला . . . . गाव आहे

2) माझ्या गावाच्या पश्चिमेला .. . . . .   गाव आहे

3) माझ्या गावांमध्ये पिण्याचे पाणी . . . . येथून येते

4) माझ्या गावाचे नाव .. . . आहे

5) माझ्या तालुक्याचे नाव . . . . आहे

6) माझ्या गावांमध्ये .. . . हे पीक जास्त प्रमाणात घेतात

4) तुझ्या गावाचे रेखाकृती नकाशा तयार कर आणि रंगभर

उत्तर पत्रिका

पाठ 1:--- प्राणी ओळख

1 _कुत्रा

2_मासा

3 _माकड

4_साप

5 _कावळा

6_हत्ती

7_साप

8_कुत्रा

9 _कावळा

10_ बगळा

11_ कोंबडी

12 _शहामृग

13 _पोपट

14 _साळींदर

15 _प्रत्येक विद्यार्थ्याचे वेगळे उत्तर

16_ काळा

17_ पावसात

18 _पक्षी

24_ उडणारे प्राणी:---- कावळा, पोपट

25_सरपटणारेप्राणी:—-- साप ,झुरळ

26_चालणारे प्राणी :------हत्ती, गाय

27_कीटक:------- मधमाशी, टोळ

पाठ 2 :---प्राण्यांचे संगोपन

1 _दूध

2 _गवत

3 _अन्न व पाणी

4 _सिंह

5_ म्हैस

6 _बैल

7 _हत्ती

8 _कुत्रा

9 _मांजर

10_ घोडा

11_ कोंबडी

12_ कुत्रा

13 _शेळी

14 _मेंढी

15 _उंट

16 _दुध

17 _बैल

18 _पाळीव

19 _अन्न व पाणी

21 _जंगली

22_ गवत

23 _स्वच्छ

पाठ 03:-----_परसातील झाडे

1_नारळ

2_अन्न

3 _वड

4 _चिंच

5 _ते आपल्याला उपयोगी असतात

6 _आंबा

7 _फळे

8 _तुळस

9 _पक्षी

10_ हवा पाणी प्रकाश

11_ झाडे

12_औषधी

13 _भोपळा

14_ सावली

15 _वायू

16_ लहान

17_पक्षी

18 _खोड

19 _रोप

20 _झाड

24 _कमळ :-पाण्यात उगमते

25_ सूर्यफूल:- सूर्याकडे तोंड करून उगमते

26_ ब्रह्मकमळ :-रात्री उमलणारे फुल

27_ फुले :-केसात घालतात

28_ मधमाशी :-मध गोळा करते

29 _जास्वंद:- लाल व पाच कळयांचे असते

30 _फुले :-झाडाचा रंगीत भाग

31_ भोपळा :-जमिनीला पसरते

32 _द्राक्ष :-फळ देणारी वेल

33_ वेल :-आधार लागतो

34 _ तूर:-वेल नव्हे

35 _काकडे :-वेलीला लागते

36 _टोमॅटो :-वेलीला आजार लागतो

37 _मुळे :-जमिनीत पसरतात

38 _पाने:- अन्न तयार करतात

39_ खोड :-रोपाला आधार देतो

40 _खते :-झाडाच्या वाढीस मदत करतात

पाठ 4 :• आम्ही आहोत तुमच्यासाठी

1. नारळाचे झाड.

2. खाण्यासाठी , पूजेसाठी, तेलासाठी.

3. खराटा बनवणे, जळणासाठी, दोर बनवणे, सावलीसाठी

4. पानाच्या काड्यांचा.

5. दोर बनवण्यासाठी.

6. विद्यार्थी अभिप्राय देतात.

7. केळीचे झाड.

8. खाण्यासाठी ,पूजेसाठी,शिकरण, चिप्स.

9. जेवनासाठी,सावलीसाठी, पूजेसाठी.

10. विद्यार्थी उत्तरे देतात.

11. विद्यार्थी चित्र काढून रंग भरतात.

12. आंबा चिकू चिंच फणस पपई द्राक्षे पेरू

13. विद्यार्थी फळझाडांची नावे लिहितात.

14. विद्यार्थी यादी बनवतात.

15. विद्यार्थी माहीत असलेल्या भाज्या ,फळे व धान्याची यादी करतात.

16. विद्यार्थी फुलांच्या नावांची यादी बनवतात.

17. सजावटीसाठी, पूजेसाठी, हार बनवण्यासाठी, वेणी बनवण्यासाठी, अत्तर बनवण्यासाठी, गुलकंद बनवण्यासाठी.

18. विद्यार्थी चित्र काढून रंगवतात.

19. गुलाब,जाई जुई,मोगरा , झेंडू ,चाफा

20. तुळस

21. खोकला, तापासाठी, सर्दी साठी

22. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

23. कडुलिंब, कोरफड, लिंबू, अडुळसा, आवळा

24. विद्यार्थी यादी बनवतात.

25. चर्मरोग, दात दुखी, साबण बनवण्यासाठी, केसांसाठी

26. आहारासाठी, सावलीसाठी, निवारा, घरटे बांधण्यासाठी.

27. गाय ,म्हैस ,शेळी, हत्ती, हरण, घोडा, बैल, मेंढी, गाढव, ससा.

28. विद्यार्थी जोड्या जुळतात.

29. विद्यार्थी रेषा मारून जोड्या जुळतात

पाठ 5 :• अमूल्य पाणी

1.विद्यार्थी यादी बनवतात.

2. नदीतून ,विहिरीतून, तळे, झरा , बोर.

3. विद्यार्थी उत्तर देतात.

4. पिण्यासाठी, जेवण बनवण्यासाठी, भांडी धुण्यासाठी, कपडे धुण्यासाठी.

5. विद्यार्थी आपले मत नोंदवतात.

6. विद्यार्थी पाण्याचे स्त्रोत सांगतात.

7. शुद्ध पाणी.

8. विद्यार्थी चित्राचा क्रम लावतात.

9. विद्यार्थी शाळेतील पाण्याचा स्त्रोत सांगतात.

10. साध्या पाण्याचा वापर करतात.

11. विद्यार्थी शुद्ध व अशुद्ध पाण्याचे शरीरावर होणारे परिणाम सांगतात.

12. विद्यार्थी चित्र बघून अशुद्ध पाणी शुद्ध कसे बनवावे हे सांगतात.

13. विद्यार्थी शुद्ध प्राण्याचा स्त्रोत सांगतात.

14. प्राणी पक्षी व वनस्पतींना पाणी हवे.

15. विद्यार्थी यादी बनवतात.

16. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

17. विद्यार्थी आपला अभिप्राय सांगतात.

पाठ 6 :• आहाराची विविधता

1. विद्यार्थी यादी बनवता.

2. शरीराच्या वाढीसाठी आणि ऊर्जेसाठी

3. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

4. विद्यार्थी उत्तरे देतात.

5. हिरव्या.

6. लाल.

7. विद्यार्थी रंग देतात.

8. विद्यार्थी यादी बनवतात

9. विद्यार्थी यादी बनवतात.

10. गाजर, काकडी, मुळा, टोमॅटो

11. विद्यार्थी चित्र काढून रंगवतात.

12. सफरचंद, पेरू, केळी,आंबा, फणस

13. विद्यार्थी नावे लिहितात.

14. विद्यार्थी फळे व भाज्या ओळखतात.

15. विद्यार्थी यादी बनवतात

16. विद्यार्थी चित्रांचा संग्रह करतात.

17. विद्यार्थी आहार पदार्थांची यादी बनवतात.

18. विद्यार्थी आपले आवडते आहार पदार्थ सांगतात.

19. वरती आहार पदार्थ सांगतात.

20. विद्यार्थी आहार पदार्थांची नावे सांगतात.

21. विद्यार्थी भांड्यांची यादी करतात.

22. विद्यार्थी घरातील भांड्यांची यादी सांगतात

23. विद्यार्थी भांड्यांची यादी करतात.

24. विद्यार्थी चित्रातील प्राण्यांचे आहार पदार्थ ओळखतात.

25. विद्यार्थी शाकाहारी व मांसाहारी प्राण्यांची नावे व त्यांचे आहार पदार्थ सांगतात.

26. विद्यार्थी जोड्या जुळवतात.

27. वनस्पतीजन्य आहार पदार्थ खाणाऱ्या प्राण्यांना शाकाहारी प्राणी असे म्हणतात. प्राणीजन्य आहार पदार्थ खाणाऱ्या प्राण्यांना मांसाहारी प्राणी असे म्हणतात.

28. वनस्पतीजन्य व प्राणीजन्य दोन्ही आहार पदार्थ खाणाऱ्या प्राण्यांना मिश्रहारी प्राणी असे म्हणतात.

पाठ 7 :- घर हवे घर

जोड्या जुळवा

1. D
2. C
3. B
4. C
5. A

रिकाम्या जागा भरा

1. 2,4
2. 2,3,4
3. शेती घर इत्यादी
4. बाथरूम नहानी
5. कचराकुंडी उकिरडा

चित्राचे निरीक्षण करून उत्तर देणे

1. आई बाबा आजी आजोबा दादा ताई आत्या
2. आई
3. ताई
4. दादा
5. आई ताई आजी इत्यादी

खालील प्रश्नांची उत्तरे दे

1. सिमेंट वीट दगड सळी वाळू खापरी वासे इत्यादी खिडक्या दरवाजा चौकट इत्यादी
2. ऊन वारा पाऊस थंडी यापासून संरक्षण करण्यासाठी प्राण्यापासून संरक्षण करण्यासाठी घराची आवश्यकता आहे
3. विद्यार्थ्यांनी दिलेली समर्पक उत्तरे

पाठ 8 शरीराचे अवयव व आरोग्य

1 डोके नाक तोंड डोळे कान गळा हात बोटे पाय पायाची बोटे

जोड्या जुळवा

1. B
2. E
3. D
4. A
5. C

चित्र पाहून रिकाम्या जागा भरा

1. अंघोळ
2. दात
3. हात
4. नखे
5. अभ्यास

चूक की बरोबर लिहा

1. चूक
2. बरोबर
3. बरोबर
4. बरोबर
5. बरोबर

खालील प्रश्नांची उत्तरे दे

1 ते 7 प्रश्नांना विद्यार्थ्यांनी दिलेली समर्पक उत्तरे तपासून गुण देणे

पाठ 9 माझी सुरक्षितता

चित्रातील वस्तू पाहून नावे दे

1. चाकू
2. ब्लेड
3. हातोडी
4. खलबत्ता
5. विळती
6. इस्त्री
7. कात्री
8. गॅस स्टो

चूक की बरोबर लिहा

1. चूक
2. चूक
3. चूक
4. बरोबर
5. बरोबर
6. चूक
7. चूक
8. बरोबर

खालील प्रश्नांना उत्तरे द्या

1 ते 10 प्रश्नांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी दिलेल्या समर्पक उत्तरांना तपासून गुण देणे.

चूक की बरोबर लिहा

1. चूक
2. बरोबर
3. चूक
4. चूक
5. बरोबर

पाठ 10 :------आम्हा सर्वांची संपत्ती

1_सर्वांसाठी

2_ सर्व लोकांसाठी असलेले मालमत्ता

3_सर्वजण

4__आपल्यापैकी प्रत्येकाने

5__आजारी लोक

6__ जपून वापरावे

7__ सर्व नागरिक

8__सर्वांचे नुकसान होईल

9 __सार्वजनिक संपत्ती

10_ बाग

11_बरोबर

12_चूक

13 _ चूक

14 _बरोबर

15 _ चूक

16 _चूक

17_ चूक

18_ चूक

19_ चूक

20 _चूक

21_ बरोबर

22_ चौक

23_ बरोबर

पाठ 11:-- प्रवास

1 _कार

2 _एका ठिकाणी जाणे

3_ मोटर

4_माणसे

5_होडी

6_बस

7_आकाशात

8 _पायाची ताकद

9 _ट्रक

10_ गाड्या आणि मानसी

11 _बस

12 _3

13 _बैल

14 _रुळावर

15 _घोडा

16 _रस्त्यावर

17_ आकाशात

18 _पाण्यावर

19 _समुद्रात

20_ दुसऱ्या

21 _नाव होळी जहाज बोट

22 _विमान हेलिकॉप्टर

23_ रुळावर

24 &रस्त्यावर

25_ बैल

26 _बस

27 _रिक्षा चालक

30_ बस

31 _जहाज

32 _विमान

33 _रेल्वे

पाठ 12 माझे कुटुंब

1_आपले आई-वडील आणि भावंडे

2_ प्रेम आणि काळजी

3 _आई-वडील, आजोबा- आजी, काका- काकू .

4 _आई-वडील व मुले

5_ काका, काकू

6 _दोन ते चार

7 _प्रेम, स्नेह, एकमेकांची मदत

8 _बरोबर

9 _चूक

10_ बरोबर

11 _ चूक

12_ बरोबर

13 _चूक

14_ बरोबर

15 _बरोबर

16 _चूक

17_ बरोबर

18_ बरोबर

19 _आपले पालक

20 _जास्त सदस्य

21 _कमी सदस्य

22_ वृद्ध सदस्य

23_ प्रेम व सुरक्षा

पाठ 13 चला खेळू

1. विद्यार्थी उत्तर देतात.

2. विद्यार्थ्यांचा अभिप्राय देतात.

3. पाहुणे ,मित्र, नातेवाईक भेटतात.

4. बारसे,वाढदिवस, लग्न समारंभ.

5. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

6. विद्यार्थी रीताच्या वाढदिवसाची गोष्ट सांगतात.

7. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

8. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

9.विद्यार्थी गोष्टी सांगतात.

10.दिवाळी ,दसरा, ख्रिसमस, रमजान.

11.हिंदूंचा -दिवाळी दसरा ,मुसलमानांचा -रमजान ईद ,ख्रिश्चनांचा - ख्रिसमस ,बौद्धांचा- बुद्ध पौर्णिमा

12.ख्रिसमस,दिवाळी, रमजान.

13. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

14. दिवाळी सण आपण आनंदाने साजरा करतो. नवीन कपडे घालतो, पूजा करतो , फटाकड्या उडवतो.

15. लाडू ,चिवडा ,करंजी, शंकरपाळी, शेव पापडी

16. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

17. रमजान

18. रमजान महिन्याच्या शेवटच्या दिवशी.

19. महिनाभर

20.ख्रिश्चनांचा.

21.25 डिसेंबर.

22. प्रभू येशूचा

23. केक वाटतात, मेरी क्रिसमस

24. महावीर जयंती, गुरुनानक जयंती, बुद्ध पौर्णिमा.

25. स्वातंत्र्य दिन ,प्रजासत्ताक दिन.

26. भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला.

27. भारताची राज्यघटना अमलात आली.

28. विद्यार्थी वर्णन करतात.

29. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

30. विद्यार्थी चित्र रंगवतात.

पाठ 14 वडीलधाऱ्यांची काळजी

1. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

2. विद्यार्थी उत्तरे देतात.

3. विद्यार्थी चित्र बघून उत्तरे देतात.

4. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

5. चित्र पाहून विद्यार्थी उत्तर देतात.

6. चालण्यास मदत करणे,औषधे आणून देणे, वस्तू आणून देणे, इतर

7. विद्यार्थी उत्तरे देतात.

8. विद्यार्थी उत्तरे देतात.

9. त्याला मदत करणे.

10. विद्यार्थी उत्तरे देतात.

11. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

12. आदराने व प्रेमाने.

13. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

14. आजारी लोकांना त्रास होतो म्हणून.

15. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

16. विद्यार्थी आपला प्रसंग सांगतात.

17. विद्यार्थी आपले मत व्यक्त करतात.

पाठ 15 सहाय्य – सहकार्य

1. विद्यार्थी कामांची यादी करतात.

2. विद्यार्थी काम करणाऱ्यांची नावे सांगतात.

3. विद्यार्थी मदत करणाऱ्यांची नावे सांगतात.

4. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

5. विद्यार्थी उत्तरे लिहिण्याचा प्रयत्न करतात.

6. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

7. विद्यार्थी चित्र पाहून प्रश्नांची उत्तरे देतात.

8. विद्यार्थी उत्तरे देतात.

9. स्वयंपाक करत आहे.

10. स्वयंपाक बनवायला मदत करत आहेत.

11. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

12. कपाट

13. घर.

14. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

15. फुलांनी.

16. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

17. फुले, सुई ,दोरा.

18. झाडे लावत आहे ,झाडांना पाणी घालत आहे,

19. विद्यार्थी उत्तरे देतात.

20. विद्यार्थ्यांचा अभिप्राय.

21. कामे लवकर होतात.

22. काम लवकर पूर्ण होणार नाही.

23. विद्यार्थी चित्र पाहून उत्तरे लिहितात.

24. विद्यार्थी जोड्या जुळतात.

25. विद्यार्थ्यांना अभिनय करण्यास मदत करणे.

पाठ 16 चला खेळू

खालील चित्रातील निरीक्षण करून तुझ्या ओळखीच्या खेळांना नावे दे

1. लपंडाव
2. गोट्यांचा खेळ
3. सापशिडी
4. थ्रो बॉल
5. विटी दांडू
6. सारी पाठ
7. लंगडी
8. कॅरम
9. क्रिकेट
10. लगोरी

अंतरंगणात खेळावयाचे खेळ

1. सारीपाठ
2. कॅरम
3. सापशिडी

मैदानी खेळ

1. लंगडी
2. लगोरी
3. क्रिकेट
4. रस्सीखेच
5. कबड्डी
6. विटी दांडू
7. भोवरा
8. हॉलीबॉल
9. थ्रो बॉल
10. दोरी उड्या
11. हॉकी

12. फुटबॉल

13. लपंडाव

खालील प्रश्नांना उत्तर दे

1. मैदानात
2. 11
3. हॉकी
4. 32
5. फासे
6. स्ट्रायकर
7. बॅट बॉल स्टम्प पॅड 11 खेळाडू

कविता पाठ करून म्हणून दाखवतात

ठिपके जोडून चित्र तयार करून रंगवतात

पाठ 17 आम्हाला हे पाहिजे

खालील प्रश्नांची उत्तरे द्या

1. विद्यार्थ्यांनी दिलेल्या समर्पक उत्तरास तपासणी करून गुण देणे
2. बाजारातून आणावयाच्या वस्तूंची यादी करेल
3. शाळेचे महत्त्व आवश्यकता त्याच्या भाषेत लिहिली
4. पाणी आणण्याचे ठिकाण नळ विहीर तळे इत्यादी सांगेल
5. औषध साठी दवाखान्याची गरज आहे

रिकाम्या जागा भरा

1. शिक्षक
2. पोस्टमन
3. औषध
4. बस
5. बाजार
6. शाळा
7. बाजार
8. रेशन दुकान
9. दवाखाना
10. बस थांबा

चित्र पाहून जोड्या जुळवून

1. B
2. C
3. A
4. E
5. D

कविता पाठ करून म्हणून दाखवतात

पाठ 18 आकाशात

खालील प्रश्नांना उत्तरे द्या

1. पूर्व
2. दक्षिण
3. उत्तर
4. पश्चिम
5. चंद्र
6. तारे
7. 14
8. डोळे खराब होण्याची शक्यता असते डोळे दिपतात

चित्र पाहून रिकाम्या जागा भरा

1. पूर्व
2. उत्तर
3. पश्चिम
4. घर
5. उत्तर

प्रयोग करून शाळेच्या ग्राउंड मध्ये मैदानामध्ये दिशा आणि त्या दिशेला येणाऱ्या घटकांच्या आधारावर विद्यार्थ्यांनी सांगितलेली उत्तरे पाडताळून योग्य गुण देणे प्रश्न क्रमांक 1 ते 7

पाठ 19 माझे गाव सुंदर गाव

खालील चित्राचे निरीक्षण करून योग्य नावे दे

1. धरण
2. डोंगर
3. नदी
4. जंगल
5. समुद्र
6. शेती

खालील प्रश्नांची उत्तरे दे

प्रश्न क्रमांक 1 ते 12 हे सर्व विद्यार्थ्यांच्या राहत्या गावाशी निगडित असल्यास कारणाने योग्य पर्याय पाहून शिक्षकांनी गुण द्यावेत

रिकाम्या जागा भरा

रिकाम्या जागेमध्ये विद्यार्थ्याच्या गावाच्या दिशेनुसार असल्याने विद्यार्थ्यांनी दिलेल्या समर्पक उत्तरांना तपासून योग्य गुण देणे

तुझ्या गावाचे रेखाकृती नकाशा तयार कर

विद्यार्थ्यांनी काढलेल्या रेखाकृती नकाशा पाहून गुण देणे